# उषा पाणंदीकरांची प्रवासवर्णने

## स्वरूप आणि चिकित्सा

संपादक

**प्रा. श्रीकृष्ण अडसूळ**

। वर्षत सकळमंगळी ।

**गोमंतक मराठी अकादमी**

प्रकाशन क्रमांक ८८
पहिली आवृत्ती : मार्च २००९

© श्रीकृष्ण अडसूळ
चौगुले महाविद्यालय,
मडगाव-गोवा- ४०३६०२.

मूल्य : १६० रुपये

मुखपृष्ठ : सतीश भावसार

प्रकाशक
गोमंतक मराठी अकादमी
मराठी भवन, आल्त पर्वरी
बार्देश, गोवा ४०३ ५२१
दूरध्वनी (०८३२) २४१३६४६ / २४१३६४७

प्रमुख विक्रेते
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

मुद्रक
प्रकाश विश्वासराव
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५

# उषा पाणंदीकर यांच्या प्रवासवर्णनातील सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ

**डॉ. बाळकृष्णजी कानोळकर**

आज मराठी साहित्यात प्रवासवर्णनाला त्याचे असे एक खास स्थान आणि मान्यता प्राप्त झालेली आहे. एक वाङ्मयप्रकार म्हणूनही 'प्रवासवर्णन' मराठी वाङ्मयविश्वात स्थिरस्थावर झालेले पाहावयास मिळते. मराठीतील 'प्रवासवर्णना'चा प्रारंभ तसा अर्वाचीन काळातला. इंग्रजांची राजवट महाराष्ट्रात, भारतात आली आणि त्यानंतर एतद्देशीय भाषातून गद्यलेखनाला गती मिळाली. प्रवासवर्णन हे अशा प्रकारचे एक 'गद्यलेखन'. मराठीतले पहिले प्रवासवर्णन १८३५ मध्ये प्रकाशित झाले ('इंग्लंड देशाचे वर्णन', श्री. नाना नारायण, मुंबई, शिळाछाप प्रेस) परंतु विष्णुभट गोडसे ऊर्फ गोडसे भटजी यांचे 'माझा प्रवास' अथवा 'सन १८५७ सालच्या बंडाची हकिकत' हे १९०७ साली प्रथम प्रकाशित झालेले प्रवासवर्णन मराठी वाङ्मयजगतात सुपरिचित तर आहेच शिवाय मान्यता पावलेले प्रथम प्रवासवर्णन म्हणावे लागेल.

मराठीत 'प्रवासवर्णनपरलेखना'करिता 'प्रवासवृत्त', 'प्रवासचित्रणात्मक लेखन', 'प्रवासचित्रण', 'प्रवासवर्णन', 'प्रवासलेखन' अशा विविध पर्यायी संज्ञा वापरण्यात आलेल्या पहावयास मिळतात. परंतु या सर्वच संज्ञा इंग्रजी 'Travelogue' या संज्ञेकरिता पर्यायी म्हणून वापरल्या गेल्या असाव्यात. इंग्रजी संज्ञांना विविध पर्यायी मराठी संज्ञा घडविण्याची आपली मराठी परंपरा तशी सर्वज्ञातच आहे. उदा, 'Romantic' करिता सौंदर्यवाद, छायावाद, स्वच्छंदवाद.

'Travelogue' याचा अर्थ 'A Lecture or talk often illustrated pictorially' म्हणजेच वारंवार उदाहरणे देऊन किंवा आकृती काढून स्पष्ट केलेले प्रवासपर भाषण' किंवा 'प्रवासपर सचित्र भाषण अगर व्याख्यान' असा दिलेला आहे. आणखी एक गोष्ट येथे लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे इंग्रजीत अशा

प्रवासाला 'Travels' असा अनेकवचनी शब्द वापरला जातो आणि त्याचा अर्थ, 'Account of occurences and observations or a journey into the foreign parts' असा दिलेला आहे. मराठीत याचा तर्जुमा पुढीलप्रमाणे करता येईल, 'परदेशात घडलेल्या आणि पाहिलेल्या गोष्टींचा वृत्तांत.' मात्र येथे 'परदेश' या संज्ञेचा अर्थ 'देशसंबंधित' असा न घेता तो 'स्थलविशेष' असा व्यापक संदर्भात घेतला पाहिजे. जसा, 'अपरिचित प्रदेशातला प्रवास आणि त्याचा वृत्तांत' परंतु 'प्रवासवर्णन' करणारी किंवा लिहिणारी व्यक्ती ही तुमच्या-आमच्यासारखी आम, सर्वसामान्य व्यक्ती असेल तर त्याने आपल्या प्रवासाविषयी जे काही सांगितले वा लिहिलेले असेल ते 'वृत्तांतवजा' 'Report' स्वरूपाचे असेल. मात्र एक कलावंत, एक साहित्यिक जेव्हा असे वर्णन करतो तेव्हा तो केवळ वृत्तांत रहात नाही तर ते त्याचे त्या प्रवासासंदर्भातील 'अनुभवकथन' असते. आणि म्हणूनच ते कलात्मक पातळीवरचे असते. अशा अनुभवकथनालाच 'प्रवासवर्णन' म्हणणे उचित ठरेल. कलावंत म्हणून त्याने केलेली ती 'नवनिर्मिती'च असते. प्रत्येक कलात्मक निर्मितीला त्याचे स्वयंभू असे एक 'स्वरूप' असते. त्याचेच असे काही 'अंगभूत घटक' असतात. प्रवासवर्णन हा वाङ्मयप्रकारदेखील एक कलात्मक निर्मिती म्हणून याला अपवाद नाही. प्रतिभाशाली मनाची संस्कारक्षमता, लालित्य, चित्रमयता, कथनरमणीयता, स्थलविशेषदर्शन, जीवनदर्शन, समाज व संस्कृतिदर्शन, मनुष्यस्वभावदर्शन, प्रसंगानुभवांची उत्कटता, जीवनातील 'थ्रिल', थरार, व्यक्तिमत्त्वाची पारदर्शकता, अनुभवविश्वाचा आगळेपणा, प्रमाणित व प्रामाणिक वास्तवचित्रण, भाषात्मकता, सूक्ष्म निरीक्षणशक्ती, तपशिलाचे भान इत्यादींचा समावेश या वाङ्मयप्रकारचे अंगभूत आणि बाह्य गुण/घटक म्हणून करता येईल.

उषा पाणंदीकर यांनी मराठी 'प्रवासवर्णना'त मोलाची भर घातलेली आहे. या वाङ्मयप्रकाराच्या विकासामध्ये त्यांचा 'सिंहिणी'चा वाटा आहे. उपरोल्लिखित अंगभूत व बाह्य गुण/घटकांनी त्यांची प्रवासवर्णने समृद्ध असलेली पहावयास मिळतात. त्यांच्या 'प्रवासवर्णनां'चा सर्वांगाने अभ्यास व्हावा ही एक आवश्यक गोष्ट आहेच परंतु त्याहूनही अधिक महत्त्वाचे आहे ते त्यांच्या या प्रवासवर्णनांचा 'Interdiciplinary study' आंतर्विद्याशाखीय अभ्यास होणे अत्यंत आवश्यक आहे असे येथे सुचवावेसे वाटते. भारतीय समाज आणि संस्कृतीचा अभ्यास (Socio-cultural study of India) या दृष्टीने विचार केल्यास त्यांची ही सर्व प्रवासवर्णने अत्यंत उपयुक्त आणि आश्वासक अशी आहेत. प्रवासासंदर्भात एका सुभाषितकाराने म्हटले आहे की,

*"तीर्थानामवलोकनं परिचय: सर्वत्र वित्तार्जनं ।*

*नानाश्चर्यनिरीक्षणं चतुरता बुद्धेः प्रशस्ता गिरः।*
*एते सन्ति गुणाः प्रवासविषये...''*

सुभाषितातून घेतलेल्या वरील अवतरणात 'तीर्थानामवलोकनं', 'परिचयः', 'नानाश्चर्यनिरीक्षण' असे शब्द आपणास भेटतात. त्याचा सरळ अर्थ 'विविध तीर्थस्थळांचे दर्शन', 'समाज व देश यांचा परिचय', 'विविध आश्चर्यकारक गोष्टींचा परिचय' असा आहे. या सगळ्यांना 'ते सन्ति गुणाः' असे म्हटलेले आहे. याचाच अर्थ हे सर्व प्रवासाचे गुण आहेत असे तो सांगतो. येथे 'गुण' हा शब्द फायदे, उपलब्धि, फलित या अर्थाने योजिलेला आहे. सुभाषितकाराचा रोख भारतीय संस्कृती व जीवनविषयक प्रणाली यांकडे आहे हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

पाणंदीकरांनी आपल्या सर्वच प्रवासवर्णनातून आसेतूहिमाचल भारतीय समाजाच्या दर्शनाबरोबरीनेच भारतीय संस्कृतीचे दर्शनही फार उत्तमपणे आणि उत्कटतेने घडविलेले आहे. 'आम्ही लमाण', 'देखणी दक्षिण', 'रुक्षभूमीतून यक्षभूमीत', 'पूर्वरूप' ही त्यांच्या प्रवासवर्णनांची प्रतीकात्मक, वेधक व यथार्थ शीर्षके यांची बोलकी उदाहरणे आहेत.

सृष्टिसौंदर्याची विविधांगी रूपे पाहताना आणि पाहिलेल्या स्थळात लपलेल्या इतिहासाचे व संस्कृतीचे, गहिरे रंग न्याहाळताना जे सहृदयमुक्त मन असावे लागते ते लेखिकेजवळ आहे. शिवाय जे नव्याने पाहिले, अनुभवले ते मोठ्या सुसंस्कृत लालित्याने वर्णन्याची शैलीही त्यांच्याजवळ आहे. त्यामुळेच त्यांची ही सर्वच प्रवासवर्णने रोचक, संदर्भसंपृक्त, ललित, मधुर आणि वाचनीय तर झालेलीच आहेत पण वाचकांचे मन आणि अनुभवविश्व समृद्ध व सुसंस्कृत करणारी आहेत. मराठी साहित्यातील मर्मज्ञ समीक्षक प्रा. गं. ब. ग्रामोपाध्ये यांनी 'मराठी प्रवासवर्णनपर वाङ्मयात चांगली भर घालणारे पुस्तक' ही त्यांच्या 'आम्ही लमाण' या पुस्तकाला दिलेली प्रशस्ती सर्वच प्रवासवर्णनांना सारखीच लागू पडणारी आहे.

प्रत्येक प्रदेशाला स्वतःची अशी एक संस्कृती असते. या संस्कृतीमुळेच तो प्रदेश ओळखला जातो. पाणंदीकरांना याचे सम्यक भान आहे. आणि म्हणूनच त्यांची ही प्रवासवर्णने वाचताना सतत जाणवत राहते की त्यांनी प्रत्येक ठिकाणाकडे, प्रदेशाकडे केवळ निसर्गसौंदर्याच्या, रसपानाच्या दृष्टिकोनातून पाहिलेले नसून तेथील संस्कृती समजून-समजावून घेण्यावर विशेष भर दिलेला आहे. भारतीय संस्कृतीला गौरवशाली बनवणारी पुरे व शहरे, देवळे व राऊळे, मंदिरे व स्मारके, शिलालेख-स्तंभलेख यांचा आवश्यक तो परिचयही लेखिकेने करून दिलेला आहे. याच्याच जोडीला दुधात साखर म्हणावी त्याप्रमाणे त्या

त्या स्थळप्रदेशातील समाजजीवन, लोकजीवनाचे चित्रण, भाषा व बोली, रूढी व परंपरा, रिती व रिवाज, संकेत व समजुती, लोकभ्रम व लोकश्रद्धा, खान-पान, घर-गृहस्थी, वस्त्र-प्रावरण, उत्सव व सोहळे, सण-समारंभ, विधी व संस्कार, लोककथा व आख्यायिका, दंतकथा इत्यादींचे पारदर्शक तितकेच प्रत्ययकारी चित्रण करून त्या त्या समाजाचे चलच्चित्रच वाचकाच्या नजरेसमोर साक्षात उभे करण्यात त्या कमालीच्या यशस्वी झाल्या असून त्यायोगे त्या त्या समाजमनाचा कानोसा आणि हृदयाचा हुंकार वाचकाच्या मर्मबंधात हळुवारपणे झंकारित करण्यात पराकोटीचे कौशल्य आणि सिद्धी त्यांना प्राप्त झालेली आहे. प्रसंगी त्यांनी केलेल्या मार्मिक व उपरोधिक भाष्यातूनही त्या त्या वर्ण्य समाजाचे जीवन आणि त्यांची संस्कृती यावर लख्ख प्रकाश पडतो. उदाहरणार्थ, 'बळी अजापुत्रांचेच होतात' किंवा 'पूर्व किंवा पश्चिम, दक्षिण असो अथवा उत्तर, प्रत्येक प्रदेशातल्या पुरुषाचा पुरुषार्थ एकच असतो.' ('पूर्वरूप')

"Sociology is one of the several specialized social sciences. Its primary objective is to gain a knowledge of man and society in so far as it may be achieved through investigation of elements, process, antecedents and consequences which are involved in group living." (Encyclopedia Britanicca, Vol.20, pp.784). "Sociology as an academic discipline represents one approach to the systematic study of man and society in order to understand and, ultimately, to attempt to help determine the course of civilization and culture." (Ibid, pp. 783)

वरील अवतरणांचा सर्वसाधारण आशय असा सांगता येईल की, समाजशास्त्र हे अनेक खास सामाजिक शास्त्रांपैकी एक शास्त्र आहे. माणूस आणि समाज याबद्दलचे ज्ञान संपादन करून, मानवी जीवनाचा शोध घेऊन त्याची निर्मिती, त्याचा मूळ घटक, त्याची जडणघडण, पूर्व स्थितिगती आणि समूह जीवनांतर्गत झालेले परिणाम वा फलित याविषयीचा अभ्यास हे या शास्त्राचे मूळ उद्दिष्ट आहे. "ही (समाजशास्त्र) एक तात्त्विक शिस्त/ज्ञानशाखा असून मानवाचा व मानवी समाजाचा सुसंगत अभ्यास हे त्याचे ध्येय आहे. अंतिमत: मानवी सभ्यता आणि संस्कृती यांची वाटचाल समजून घ्यायला ते मदत करते."

समाजशास्त्र हे वस्तुनिष्ठ (objective) असून समाजशास्त्रज्ञ हा तदंतर्गत वस्तुनिष्ठतेला (objectivity) बांधील असतो. त्याला त्याचे असे स्वातंत्र्य, व्यक्तित्त्व व व्यक्तिनिष्ठता असत नाही. या पार्श्वभूमीवर कोणताही कलाकार हा व्यक्तिस्वातंत्र्याचा चाहता असतो. त्याच्या कलेत व्यक्तिविशिष्टता वा व्यक्तिनिष्ठताही

दिसून येतेच किंबहुना ती त्याच्या कलेचा प्राण असते.

जी गोष्ट समाजशास्त्र आणि समाजशास्त्रज्ञाची तीच गोष्ट संस्कृतिअभ्यास व संस्कृतिअभ्यासकाची. त्यालाही त्या अभ्यासशास्त्राची म्हणून काही मूलभूत बंधने असतात. त्यात सर्वात महत्त्वाची बंधने म्हणजेच वस्तुनिष्ठता आणि अभिनिवेश शून्यता: संस्कृतिअभ्यासक हा वस्तुनिष्ठ असावा लागतो. त्यापेक्षाही तो अधिक अभिनिवेशशून्य वा निर्भिनिवेश असावा लागतो. हा गुण प्राप्त करायचा असेल तर त्याला सर्व प्रकारच्या 'ममत्वाला तिलांजली द्यावी लागते. माझा देश, प्रदेश, माणूस, समाज, भाषा, धर्म-पंथ, जातपात, संस्कार-संस्कृती या आणि अशा प्रकारच्या ममत्वाची भावना निर्माण करणाऱ्या बंधनापासून तो मुक्त असावा लागतो. न पेक्षा ही ममत्त्वाची भावना त्याच्या मनात आणि म्हणून कृतिउक्तीत 'माझे-तुझे'पणाची जाणीव निर्माण करते. परिणामत: त्याची कृती वा वर्तन रागालोभांचे शिकार होते. आणि ते व्यक्तिगत विकारवश स्वरूप प्राप्त करते. परिणामी यातून एक प्रकारची तौलनिकवृत्ती त्या कलावंतामध्ये निर्माण होऊ शकते. परंतु त्याचा त्याने मोठ्या विवेकाने वापर केला तर ते त्याने निर्माण केलेल्या कलाकृतीला (येथे प्रवासवर्णनाला) ते एक मोठे वरदानच ठरून जाते.

प्रवासवर्णनकार हा समाजशास्त्रज्ञ नसतो तसेच तो संस्कृतीचा अभ्यासक वा संशोधकही नसतो. तो असतो एक कलाकार. कलाकाराच्या संवेदनक्षम मनाने समोर आलेल्या समाजाचे व संस्कृतीचे जे दर्शन तो आपल्या कलात्मक दृष्टिकोनातून घेतो त्याद्वारेच त्याच्या लेखनातून समाजजीवन व संस्कृतिदर्शनाचे चित्रण घडून येत असते. तो हाडामासाचा माणूस असल्याने प्रसंगी त्याच्यामधील ममत्वप्रवृत्ती जागृत होत असते. परंतु त्यायोगे काही तौलनिक निरीक्षणे व अभ्यास त्याच्या लेखनातून आढळतात.

उषा पाणंदीकर यांनी 'आम्ही लमाण' या प्रवासवर्णनाची तीन विभागांत मांडणी केलेली आहे. पहिल्या भागात सौराष्ट्र व गुजराथ आणि मारवाड व राजस्थान या प्रदेशातील भ्रमंतीचा समावेश आहे तर दुसऱ्या भागात उत्तरप्रदेश व मध्यप्रदेशातील दौऱ्याचा समावेश केलेला आहे. तिसऱ्या विभागात त्यांनी नेपाळ आणि बिहार येथे केलेल्या प्रवासविषयीचे वर्णन केलेले आहे. पहिल्या विभागात गुजरात आणि राजस्थानातील समाजजीवन व लोकजीवन आणि संस्कृती यांचे मनोज्ञ दर्शन त्या वाचकाला घडवितात. गुजराथमध्ये त्यांनी मुख्यत: दोन ठिकाणे पाहिली. पहिले अहमदाबाद शहर आणि दुसरे म. गांधींचा साबरमती आश्रम. अहमदाबादमधील मंदिरे आणि मशिदींची वर्णने त्या बहारीने करतातच परंतु त्यामागील इतिहासही त्या रंगवून सांगतात. साबरमतीच्या आश्रमासंबंधाने लिहिताना महात्मा गांधीजींच्या हट्टी स्वभावामुळे कस्तुरबा आणि त्यांच्या मुलांवर

झालेल्या अन्यायाबद्दल त्यांची लेखणी कमालीची परखड बनते. राजस्थानविषयी लिहिताना आख्यायिका आणि दंतकथांच्या झिरझिरत्या पडद्याआड दडलेल्या आणि मूक आक्रोश करणाऱ्या पराक्रमी रजपुतांच्या लेकीसुनांच्या जिवंत जोहाराला त्या वाचा फोडतात. तत्कालीन स्त्रीजीवनाविषयी त्यांनी केलेले सखोल चिंतन हृदयस्पर्शी असेच आहे. रजपुतांच्या तेजस्वी, समशेर संस्कृतीला असलेली काळी किनार त्यांनी परखडपणे दाखवून दिलेली आहे. उत्तरप्रदेशातील कानपूरच्या संदर्भात त्यांना १८५७ सालच्या बंडाची आठवण होते आणि तदनुषंगिक समरप्रसंगाचे त्या वर्णन करतात. त्यातूनही तेथील सामाजिक स्थितिगतीवर चांगलाच प्रकाश पडतो. अलाहाबादच्या निमित्ताने लेखिका नेहरू घराण्यावर प्रकाश टाकते. बिहार मुक्कामी त्यांना जशी साथी जयप्रकाशजींची आठवण होते त्याचबरोबरीने बुद्ध धर्म, सम्राट अशोक, त्याचा स्तंभ आणि आज्ञापत्रे यांचे स्मरण त्यांना होते आणि या स्मरणविलासातून त्या प्रदेशातील कालच्या आणि आजच्या सामाजिक संस्कृतीविषयीचे वर्णन व विवेचन त्या करू लागतात. शेवटच्या टप्प्यात नेपाळ मुक्कामी, प्रत्येक दुकानी राजा-राणीचे फोटो पाहून त्यांना आश्चर्य वाटते. तसेच तेथील स्त्रीराज्य, स्त्री व तिचे जीवन याविषयीचा एक आलेख त्यांच्या या वर्णनातून वाचायला मिळतो. या वर्णनाला दंतकथा, आख्यायिका व पुराणकथांचे फार शोभिवंत व मनोवेधक अस्तर त्यांनी लावलेले आहे.

'रुक्षभूमीतून यक्षभूमीत' या प्रवासवर्णनात त्यांनी गुजराथ, राजस्थान यांसारख्या वाळवंटी आणि रुक्ष प्रदेशातील तर जम्मू व काश्मीर, पंजाब व हिमाचल प्रदेश यांसारख्या निसर्गसंपन्न व नयनरम्य 'यक्ष' भूमीचे वर्णन केले आहे. गुजराथी लोकांविषयी लेखिका म्हणते, ''जोडोनिया धन उत्तम व्यवहारे' आणि त्याची उदास विचारी ते वेच करतात. आपल्या वेड्याबागड्या तुकारामाचा विचार ते पाळतात. संचय करून मग ठरावीक रक्कमेचे दान करतात. एकाने केले की दुसरा त्याची री ओढतो. ती प्रतिष्ठेची बाब आणि मग मळलेली वाट होते.'' राजकोट संस्थानातील खेडी आणि तेथील गेरू-चुना-माती यांनी रंगवलेली घरे, त्यावरची त्रिकोण-चौकोनाची भित्तिचित्रे, शेणाने सारवलेल्या हिरव्यागार अंगणातील गोपद्म, घरातील भांड्यांची उतरंड, झोपाळ्याच्या पितळी साखळ्या, कड्या या साऱ्यातून जाणवणारा सुखवस्तूपणा याचे यथार्थ चित्र त्यांनी आपल्या या प्रवासवर्णनात केलेले आहे.

त्याचप्रमाणे सौराष्ट्रविषयी वर्णन करताना प्रथम 'सौराष्ट्र' या नावाची कूळकथा, तेथील सौर संप्रदाय, सूर्योपासनेची प्रथा व नेमधर्म याविषयीची बरीच संस्कृतिसंपृक्त माहिती वाचकाला येथे वाचायला मिळते. मनालीच्या संदर्भात लिहिताना, 'मनाली... मन्नाल... मनुआलाय... प्रजापती मनूचे निवासस्थान अशा

प्रकारच्या व्युत्पत्तीचा शोध घेण्याच्या वृत्तीतून ती एक प्रकारे संस्कृतिदर्शनच घडवत असते. रावी, गंगा, सिंधू, सरस्वती आणि नर्मदा या नद्यांच्या तीरावर नांदलेल्या समृद्ध व श्रेष्ठ भारतीय संस्कृतीचे दर्शन येथे त्या घडवतात. शिवाय त्या त्या स्थळाशी निगडित ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाच्या स्मरणाने तिच्या मनात कंप पावलेली स्पंदने वर्णनाच्या ओघात कागदावर अलगद उतरतात. जम्मू आणि काश्मीर येथील निसर्गसौंदर्याप्रमाणेच त्या भागाशी सांस्कृतिक जवळीक साधण्याचा लेखिकेने आटोकाट प्रयत्न केलेला आहे. तिबेटी लोकांच्या दु:खाने ती अस्वस्थ होते. लाल सदरा घातलेले लामा शांत वातावरणात देवळाच्या दाराशी मंत्र म्हणत असल्याचे तिला दिसतात. चीनने तिबेटचा घास घेतल्यामुळे त्यांच्यावर वनवासी जिणे जगण्याची वेळ आली, मातृभूमीशी ताटातूट झाली. त्यांना पाहून तिचे मन द्रवते परंतु ज्योतिषशास्त्रावरच्या त्यांच्या फाजील विश्वासाची चीडही ती व्यक्त करते. या प्रदेशातल्या मंदिरांचा इतिहास सांगत असताना स्वत:च्या मनाला न पटणाऱ्या गोष्टींचा खरपूस समाचार लेखिकेने घेतलेला आहे. हिमाचल प्रदेशातील लोकजीवन, चालीरीती, तेथील संस्कृती यांचे सुरेख वर्णन त्यांनी केले आहे. पंजाबी लोकांची उत्सवप्रियता, तेथील सामाजिक व सांस्कृतिक समृद्धी, नद्या-धरणे यांचे चलच्चित्र त्या वाचकांच्या समोर साकार करतात. त्यांच्या या प्रवासवर्णना संदर्भात प्रा. शुभदा शहा लिहितात, "हा प्रदेश-परिसर पाहणारी दृष्टी कलावंताची आहे, जी व्यक्तिनिष्ठ आहे. रुक्ष-यक्ष प्रदेशासमवेत तेथील संस्कृतीचा लेखिकेने घेतलेला हा वेध आहे. संस्कृतीचा विचार म्हणजे त्या त्या प्रदेशातील समाज, धर्म, अर्थ, कला, ज्ञान, जीवनमूल्ये, मनोधारणा इत्यादींचा सर्वांगानी केलेला विचार. हे प्रवासवर्णन लालित्यपूर्ण होण्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यात प्रस्फटित होणारे संस्कृतिदर्शन."

'आम्ही लमाण' आणि 'रुक्षभूमीतून यक्षभूमीत' या दोन्ही प्रवासवर्णनातील प्रवासाचा प्रदेश एकच असला तरी वर्ण्यविषय व वस्तू एकच नाही. तरीदेखील तेथील समाज व संस्कृती ही वेगळी नाही. या दृष्टीने काहीसा पुनरावृत्तीचा दोष आढळून येतो. परंतु त्यामुळे दुसरा एक फायदा झालेला आहे तो म्हणजे 'अधिकस्य अधिकम् फलम्' हा होय.

'देखणी दक्षिण' या पुस्तकाला लिहिलेल्या 'दोन शब्द' या आपल्या मनोगतात लेखिका म्हणते, "भारतीय चारही दिशांचा मी शोध घेतला. पूर्व-पश्चिम आणि उत्तर या दिशांची माझी भटकंती शब्दबद्ध करून प्रसिद्धीच्या प्रकाशात आणली. राहिली होती ती दक्षिण. तिचा दौरा या पुस्तकात वाङ्मयरूपात मांडला आहे.

तिन्ही बाजूंनी प्रशांत सागराने वेढलेला हा प्रदेश सुंदर आहे, सुपीक आहे.

येथे नेहमीच कला जोपासली गेली आहे आणि धार्मिक दृष्टीने ती पवित्रही मानली गेली आहे. येथे वास्तुकला, शिल्पकला, नृत्य, नाट्यकला प्रगत झाली होती याची साक्ष हा दक्षिणेचा परिसर देतो. निसर्गाचाही या भूमीवर वरदहस्त आहे, याचीही आपल्याला सातत्याने प्रचिती येते. खरोखरच ही दक्षिण देखणी आहे. या प्रवासवर्णनाचे वैशिष्ट्य असे की द्रविड समाज आणि संस्कृतीचा लेखिकेने वाचकांना सुयोग्य परिचय करून दिलेला आहे. विंध्य पर्वताच्या खालील भागात दक्षिणापथाच्या दक्षिणेला पूर्वापार वसलेला हा द्रविड समाज व त्याची वेगवेगळी कुळे, त्यांची संस्कृती, त्यांचे लोकजीवन, लोककला, देव-देवता, मंदिर व मठ, सण आणि उत्सव, रूढी आणि परंपरा यांचा एक रसरसता प्रवासलेख म्हणजे हे प्रवासवर्णन. हे प्रवासवर्णन म्हणजे केवळ 'तीर्थावळी' नव्हे. दक्षिणेतली प्रमुख पुरे आणि शहरे, प्राचीन तशीच अर्वाचीन, त्यात हळेबीड, हंपी, बंगलोर, हैद्राबाद, मद्रास इत्यादी अनेक शहरांची माहिती व वर्णने वाचायला मिळतात. येथील मंदिराविषयी लेखिका लिहिते, "मंदिरे ही राजांची, सम्राटांची, वैभवाची, सुबत्तेची खूण होती." थोड्या राजांना मंदिरे बांधणे हा विसावा होता आणि थोड्यांनी कलेला उत्तेजन देण्यासाठी अशा वास्तू बांधल्या. इजिप्तमध्ये मंदिरे गुलामांकडून बांधून घेतली गेली तशी वेठबिगारी येथे झाली नाही हा स्वखुशीचा मामला होता. मोबदला देऊन ही कामे झाली होती. दक्षिणेची ही मंदिरे म्हणजे छुप्पे किल्लेच आहेत आणि ही अजस्त्र देवालये सगळा गाव एकत्र होण्याकरिता बांधली असावीत असे लेखिका म्हणते ते मान्य करावे लागेल. याच प्रवासवर्णनात लेखिका पुढे म्हणते, "गाव आधी की पाणवठा आधी हा संशोधनाचा विषय आहे आणि मंदिर आधी की आख्यायिका हीदेखील विचार करण्यासारखी गोष्ट आहे." यातून लेखिकेने समाज-संस्कृतीच्या जडणघडणीवर नेमकेपणाने बोट ठेवलेले आहे, भाष्य केलेले आहे माणसाच्या मनात वसत असलेल्या विकृतीला फटकारताना ती लिहिते, "भूक, तहान, निद्रा तसेच मैथुन ही आपल्या जीवनाची गरज. त्यात लाज वाटण्याचे काहीच कारण नाही आणि त्याकरिताच ही संभोगशिल्पे निर्माण झाली; पण या नग्न शिल्पांवर भडक, उभ्या पट्ट्यांच्या चड्ड्या रंगवल्या होत्या आणि नंदीला कमरेवर फडके बांधले होते."

तामिळनाडूत असलेल्या 'कोलवू' या मुलींच्या सणाचा परिचय वाचकाला होतो आणि उभ्या विश्वात असा सण फक्त जपानमध्ये साजरा होतो ही माहिती वाचून वाचक आश्चर्यचकित होतो. लेखिका म्हणते, "हा सण सारा तामिळनाडू पाळतो. या सणात मुलींच्या साऱ्या बाहुल्या जमवल्या जातात. त्यांची आरास केली जाते. सरस्वतीसंगे त्यांची पूजा केली जाते." एवढे सांगून झाल्यावर लेखिकेने नोंदवलेले निरीक्षण वाचकाला विचार करायला लावणारे आणि मार्मिक

आहे. ती म्हणते, "म्हणूनच सुब्बलक्ष्मी अम्मु, स्वामिनाथन, रुक्मिणीदेवी अशा सरस्वतीसारख्या तेजस्वी स्त्रिया इथे जन्माला आल्या आहेत." मुदराईच्या मीनाक्षी मंदिराच्या संदर्भात लेखिका लिहिते, "कंबथडी मंडपात मीनाक्षीच्या विवाहाचे शिल्प आहे. पत्थराने जणू गीत गायिले आहे. त्याला शब्द फुटले आहेत." त्यांनी पुढे सांगितलेली माहिती ही समाजशास्त्र आणि संस्कृतीच्या अभ्यासकांना मोठे खाद्य पुरविणारी आहे. त्याचबरोबर सहजीवन व सहअस्तित्वातून संस्कृतिसंगम घडवू पाहणाऱ्या आपल्या दूरदृष्टीच्या, पूर्वजांच्या विशाल व नितळ मनोवृत्तीचे दर्शन त्यातून निश्चितपणे घडते. मीनाक्षी विवाह म्हणजे 'मीनाक्षी कल्याणम्.' त्याविषयी लेखिका माहिती देते की, "मीनाक्षी ही शाक्त धर्मातली तर सुंदरेश्वर 'छोक्कालिंगम' हा शैव आणि 'अलगर' हा विष्णू अवतार. तिरुमल नायक या दूरदृष्टीच्या राजाला या तीनही धर्मात एकी हवी होती आणि त्याने हे मीनाक्षी कल्याणम् आरंभले.'

केरळमधील 'ओणम' या सणाची माहिती वाचकाला या प्रवासवर्णनातूनच होते. नागपूजा हे केरळचे वैशिष्ट्य असल्याचे आणि नागावरूनच नायर हा शब्द आला असे लेखिका सांगते. स्नानमहात्म्य सांगताना लेखिका एके ठिकाणी लिहिते, "स्नान ही सौंदर्यप्रसाधनाची सुरुवात. अभ्यंगस्नान ही सोळा शृंगारांपैकी एक. दशावतारासंबंधाने लेखिकेने केलेले चिंतनही मोठे मार्मिक म्हणायला हवे. गोव्यातील दशावतार, कर्नाटकातील यक्षगान आणि तंजावरचा दशावतार यांची त्यांनी केलेली तुलना त्यांच्या शोधक आणि वेधक दृष्टीचा विशेष म्हणावा लागेल. महाबलीपुरम् येथील शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून ओळखले जाणारे विष्णू मंदिर आणि तेथील रथोत्सव याविषयी विस्ताराने लेखिकेने कथन केलेले आहे.

'पूर्वरूप' या पुस्तकातून सौ. पाणंदीकर यांनी वाचकांना पूर्वांचलाच्या प्रदेशाची सफर घडवलेली आहे. ही सफर घडवीत असताना त्यांनी तेथील जन, जल, जमीन, जंगल आणि जमीर यांचा यथार्थ परिचय करून दिलेला आहे. पूर्वांचलाचा इतका सुंदर आणि सकस अनुभव दुसऱ्या एखाद्या पुस्तकातून अभावानेच पाहायला मिळेल. नागालँड, मिझोराम, मणिपूर इत्यादी राज्यांतील जनता आणि त्यांच्या राजकीय आणि आर्थिक स्वातंत्र्याकरिता सतत चाललेला संघर्ष याचा एक परिपूर्ण आलेख त्या काढतात. तेथील लोकांची निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित परिस्थिती आणि आपत्तींशी चाललेला निकराचा संघर्ष आणि त्यातून उभ्या राहिलेल्या उल्फा, बोडो, आसू, नागा, मिझोसारख्या संघटना, त्यांचा लोकलढा आणि त्यांची अदम्य स्वातंत्र्याकांक्षा, त्यांचा जय-पराजय या सर्वांचा चलच्चित्रपटच त्या वाचकांच्या नजरेसमोर साक्षात उभा करतात.

आदीकाळापासून तेथे चालत आलेली आर्य, अहोम, बंगाली, बिहारी, गुजराती, मारवाडी, ब्रिटिश मिशनरी यांची घुसखोरी आणि या पार्श्वभूमीवर त्यांचे चाललेले सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक शोषण, दमन आणि परिणामता भाळी आलेली गुलामगिरी यांचा जणू इतिहासच त्यांनी या प्रवासवर्णनातून उभा केलेला असून हे प्रवासवर्णन म्हणजे या प्रदेशाचा सर्वांगीण अभ्यासाचा एक महत्त्वाचा ग्रंथ ठरावा इतकी त्याची संदर्भसंपृक्तता विपुल, सखोल व मूलगामी आहे. तिथल्या देव-देवता, सण-उत्सव, नृत्य-क्रीडा, कला आणि संस्कृती याचा यथार्थ परिचय लेखिकेने घडविलेला आहे. या प्रदेशाच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनाचा लेखिकेने घेतलेला उभा-आडवा छेद हा या प्रवासवर्णनाचा खास विशेष होय. जाता जाता आसाम, नागालँड येथील समाज आणि गोवा व गोवेकर यांच्यात आढळून येणाऱ्या अनेक साम्यस्थळांवर त्यांनी नेमकेपणाने बोट ठेवलेले असून त्यांचा हा प्रयत्न समाज-संस्कृतीच्या तौलनिक अभ्यासाला उद्युक्त करणारा आहे. आसाम आणि नागालँडच्या वर्णनामध्ये महाभारतकालीन अनेक संदर्भ आणि कथानकांचा त्या उल्लेख करतात. याच संदर्भात त्यांनी भूमिपुत्र राजा नरकासुराच्या सर्व परिचित कथानकातील फोलपणा दाखवून देण्याचा स्तुत्य प्रयत्न केलेला असून वाचकाला पुनर्विचार करायला उद्दिपित केलेले आहे. नरकासुराची महानता अधोरेखित करताना त्यांनी केलेले उपरोधिक भाष्य मोठे मार्मिक आहे. त्या लिहितात, "आजच्या दिवसात श्रीकृष्णापेक्षा नरकासुराचे महत्त्व जास्त झाले आहे. नरकासुराच्या स्पर्धा होतात. भले मोठे नरकासुर इथे तिथे नाचतात. श्रीकृष्ण तिथे नावापुरता असतो. काळाने हा सूड तर उगविला नाही ना!"

आसाम येथील आदिम धर्म, आदिशक्ती उपासना, तिथला शाक्त पंथ, त्यांची मूर्तिविहीन मंदिरे, तिथील उपासना व पूजापद्धती, तेथील एकेकाळची मातृप्रधान संस्कृती आणि आजच्या काळात मागे राहिलेल्या त्याच्या खुणा याविषयी त्यांनी खूपच विस्ताराने लिहिलेले आहे. चहाचे मळे आणि त्यातील मजूर-मालक संघर्षाविषयीही त्यांनी माहिती सांगितली आहे. नागा लोकांविषयी माहिती देताना त्या लिहितात की, "सगळेच नागा एका वंशाचे नाहीत. त्यांच्यात ८६ जमाती, त्यातल्या सोळा जमाती प्रसिद्ध आहेत. सर्वांत कडवी जमात आहे ती तांखुल नागा आणि हे सगळेच नागा नागालँडमध्ये राहतात असे नाही. मणिपूरचा डोंगराळ भाग... आसाम, अरुणाचल इथे त्यांची वस्ती आहे. धर्मांतराच्या बलात्काराला बळी पडली ती हीच जमात... त्यांच्यात ६० बोली आहेत. आणखी पोटजमाती असल्याने पोटबोलीही आहेत. त्यांचे सण हिंदू धर्माशी जवळिकेचे... हिंदू कॅलेंडरप्रमाणे पौर्णिमा, अमावास्या, अधिक मास... चांद्र वर्षाप्रमाणे साजरे करणारे... नागाच्या एका जमातीचे भगवंताचे देऊळसुद्धा होते म्हणे..."

'मिझोराम' हे भारताच्या पूर्वेकडील प्रदेशाचे नाव, 'मि' म्हणजे माणूस. 'झो' म्हणजे डोंगर, पहाड आणि 'राम' म्हणजे प्रदेश. मिझो म्हणजे डोंगर, पहाडाच्या अंगावर खेळणारा... उंचीवर, पर्वतराजीवर बागडणारा माणूस... या जमातीला आपण मिझो म्हणतो; ते मात्र स्वत:ला त्वलांग म्हणून घेतात." या शब्दांत त्या मिझोची ओळख वाचकाला करून देतात. त्यांच्यात जातीयतेला थारा नाही हे वर्णनाच्या ओघात कळून येते. मिझो पुरुष स्वभावत: विलासी व चंडोल वृत्तीचे असल्याचेही कळते. मणिपूरची ओळख करून देतानाही लेखिकेने महाभारतातील ज्ञात कथानकांचा समर्पक उपयोग करून घेतलेला आहे. 'चावल है... पानी है लेकीन चुल्हा नही' अशी मणिपूरची स्थिती आहे. तेथे वैष्णव, मैतेई असे लोकसमाज राहतात. काझिहरोबा नृत्य, नाम हे पुरुषी नृत्य अशी अनेक प्रकारची प्रासंगिक व धार्मिक नृत्ये त्यांच्या संस्कृतीचे व्यवच्छेदक अंग आहे. एकूणच पूर्वांचलाच्या प्रदेशातील संस्कृती ही नृत्याला अधिक महत्त्व देताना दिसून येते. मणिपुरी समाजाच्या स्त्रीप्रधानतेविषयी लिहिताना लेखिका सांगते, "हे स्त्रियांचे राज्य, असे पुराणकाळापासून म्हणतात. इथे स्त्रियांची संख्या अधिक... त्यामुळे एका पुरुषाला अनेक बायका असतात, पण ती कमावती. अर्थात निवडीचे, निर्णयाचे स्वातंत्र्य तिला अगदी पुराणकाळापासून आहे."

◆